


दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २०५ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.१ जून २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

# वाघांच्या होणाऱ्या हल्ल्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करा

## आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे वनविभागाला निर्देश

## वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण बैठक

**चंद्रपूर (प्रतिनिधी): जिल्ह्यात वाघांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या दीड महिन्यात नऊ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे लोकांमध्ये असंतोष पसरत चालला आहे. या वाढत्या हल्ल्यांमुळे नाहक जीवितहानी होत असल्याने ही बैठक आयोजित करण्यात आली. ग्रामस्थ तसेच जनावरांच्या जीवित नुकसानीची गंभीरता लक्षात घेऊन, वनविभागाने वाघांच्या होणाऱ्या हल्ल्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बैठकीत दिले.मुल तालुक्यातील वाघांच्या हल्ल्यांत ठार झालेल्या नागरिकांसंदर्भात वनविभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत रामबाग विश्रामगृह येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर, वनसंरक्षक तथा ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक प्रभुनाथ शुक्ला, उपसंचालक (बफर) कुशाग्र पाठक, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, मूलचे उपविभागीय अधिकारी अजय चरडे, तहसीलदार मृदुला मोरे, विभागीय वनअधिकारी (प्रोटेक्शन) निकिता चौरे, सहाय्यक वनसंरक्षक (बफर) संकेत वाठोरे, आदेश शेडंगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल कारेकार, प्रियंका वेलमे आदींची उपस्थिती होती.**



आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, भगवानपूर गावातील वाढत्या मानव वन्यजीव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर तातडीने कुंपण मंजूर करून घेणे. मुल तालुक्यातील शेतकऱ्यांना जंगलामध्ये पडून असणारे बांबू कुंपणासाठी उपलब्ध करून द्यावेत.यासाठी वनविभागाने गावात जाऊन शेतकऱ्यांची नोंदणी करावी व शेतकऱ्यांना बांबूचा पुरवठा करावा. एफडीसीएमसह वनविभागाने कुंपणासाठी लागणारे अंदाजपत्रक तयार करावे. भगवानपूर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना २० मीटर अंतरावरील झुडपे कापण्यात यावीत.वाघाचे होणारे हल्ले टाळण्यासाठी सरपनासाठी कोणीही जंगलात जाऊ नये. गावकऱ्यांना सरपन आवश्यक असल्यास त्यांनी वनविभागाशी संपर्क साधावा. यासाठी शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येऊन त्यांना वनविभागाकडून सरपन उपलब्ध करून देण्यात यावे. गत दीड महिन्यात वाघाच्या हल्ल्यांमध्ये नऊ ग्रामस्थांचा मृत्यू झाला असून, याबाबत वनविभागाने वाघांची अचूक माहिती घ्यावी. मागील दोन वर्षांत २२ वाघांना पकडण्यात आले आहे. जिल्ह्यातील वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाचा विचार करता, अशा घटना टाळण्यासाठी आणि प्रसंगी तातडीने प्रतिसाद देण्यासाठी प्रत्येक विभागामध्ये प्राथमिक बचाव दल (झठढ) तैनात करण्यात आले असून, त्यात एकूण ९१७ सदस्य कार्यरत आहेत.शेतकऱ्यांसाठी ई-पिक पाहणीद्वारे जशी पिकांची माहिती संगणकीकृत प्रणालीतून गोळा केली जाते, तशीच एक सुसंगत प्रणाली वनविभागासाठीही तयार करता येईल. सोलर कुंपणाच्या बाबतीत तांत्रिक माहिती घेऊन स्वतंत्र माहितीपत्रक तयार करावे.दुर्गापूर परिसरात बिबट्याचा वावर अधिक असल्याने दुर्गापुर, वनअकॅडमी पासून ते सिनाळा गावापर्यंत डव्हान्स सोलर फेंसिंग करण्यासाठी कॅम्पाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. निधीस मंजूरी मिळालेली असली तरी अद्याप निधी प्राप्त झालेला नाही. याबाबत पाठपुरावा करावा. ख्रिश्चन समाजाला दफनभूमीसाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालयाकडून वाईल्डलाईफ क्लिअरन्स घेण्याची आवश्यकता असल्याचेही आमदार मुनगंटीवार म्हणाले.पिपरी दीक्षित येथील स्मशानभूमीची जागा महसूल विभागाच्या अखत्यारीतील असून त्याला लागूनच वनविभागाची जागा आहे; मात्र, वनविभागाकडून चुकीची मोजणी करण्यात आली असून चुकीचा नकाशा तयार करण्यात आला आहे. याबाबत मुल तहसीलदारांनी विशेष लक्ष देवून पाठपुरावा करावा.वनविभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समन्वय साधून मूल बायपासचा प्रश्न महिनाभरात मार्गी लावावा

तेंदूपत्ता हंगामात ५० ते ६० हजार लोक जंगलात जातात, मात्र ते वनविभागाच्या नियमांचे पालन करत नाहीत तसेच ठरावीक समूहांमध्ये राहत नाहीत, त्यामुळे वनविभागाला जंगलावर नियंत्रण ठेवणे कठीण जाते. परिणामी, वाघांचे हल्ले वाढून मनुष्यहानी होते. अशी माहिती मुख्य वनसंरक्षक डॉ.जितेंद्र रामगावकर यांनी दिली.

# चंद्रपूर भाजपा जिल्हाध्यक्षपदी हरिश शर्मा यांची नियुक्ती

## बल्लारपूर मतदारसंघाला जिल्हाध्यक्षपदाचा बहुमान

## आ.सुधीर मुनगंटीवार यांनी दिल्या शुभेच्छा



**चंद्रपूर (प्रतिनिधी):** एकात्म मानवतावाद आणि अंत्योदय या तत्त्वांवर कार्य करणाऱ्या, जगातील सर्वात मोठ्या राजकीय पक्ष अर्थात भारतीय जनता पक्षाच्या चंद्रपूर जिल्हा (ग्रामीण) अध्यक्षपदासाठी नुकतीच नियुक्ती जाहीर करण्यात आली. या निवडीअंतर्गत हरिश शर्मा यांची पुन्हा एकदा जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.विशेष म्हणजे पुन्हा एकदा बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाला जिल्हाध्यक्ष पदाचा बहुमान मिळाला आहे. हरिश शर्मा यांच्या नेतृत्वाखाली यापूर्वी पक्ष संघटनेने भक्कम कामगिरी केली असून त्यांची कार्यक्षमता, संघटन कौशल्य आणि व्यापक जनसंपर्क यामुळेच त्यांना पुन्हा ही जबाबदारी देण्यात आली आहे.या पुनर्नियुक्तीबाबत अभिनंदन व्यक्त करताना राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, हरिश शर्मा यांच्या सक्षम नेतृत्वामुळे पक्ष संघटना अधिक बळकट होईल आणि पक्षाचे विचार शेवटच्या व्यक्तीपर्यंत प्रभावीपणे पोहोचतील,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


# मातीचा ढिगारा कोसळून मजुराचा मृत्यू

# शासकीय हलगर्जीपणामुळे घेतला हकनाक बळी

## मुमरी धरण प्रकल्पाजवळील दुर्घटना; आरपीआयचे राहूल दोंदे यांनी घेतली गंभीर दखल

**खैरे (प्रतिनिधी):** सारंगपुरी-खैरे गावाजवळील मुमरी धरण प्रकल्पाच्या बांधकामासाठी सुरू असलेल्या खोदकामात मातीचा भला मोठा ढिगारा अंगावर कोसळल्याने एक गरीब दलित मजूर जागीच मृत्युमुखी पडला. ही हृदयद्रावक घटना १७ मे रोजी दुपारी २ वाजता घडली.मृत मजुराचे नाव गणपत दगडुजी पडवळ (वय ५५, रा. वाडाळ, ता. वाईजापूर, जि. संभाजीनगर) असे असून, तो आपल्या कुटुंबातील एकमेव कर्ता पुरूष होता. प्रकल्पातील बांधकाम ठेकेदार व संबंधित अभियंत्यांच्या बेपर्वाईमुळे ही जीवघेणी दुर्घटना घडल्याचा आरोप होत आहे.

घटनेनंतर आठवडाभर उलटूनही संबंधित शासकीय अधिकारी व ठेकेदारांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. जलसंपदा विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग एकमेकांवर जबाबदारी ढकलताना दिसत असून, त्यामुळे प्रशासकीय पातळीवर कमालीची उदासीनता आणि चिडीचूप्पी पाहायला मिळत आहे.या प्रकरणी आरपीआयचे वासिंद विभागीय अध्यक्ष राहूल दोंदे यांनी गंभीर दखल घेतली असून, संबंधित अधिकारी व कंत्राटदारांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यासाठी लेखी तक्रार दाखल केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.दुर्घटनेमुळे पडवळ कुटुंबावर आभाळ कोसळले असून, शासनाने तात्काळ मदतीचा हात पुढे न केल्यास आंदोलनाचा इशारा आरपीआयतर्फे देण्यात आला आहे.




# दुचाकी चोरट्यांचा पर्दाफाश : पिशोर पोलिसांची कारवाई, १२.७० लाखांच्या १४ मोटरसायकली जप्त

**पिशोर । जावेद शेख**

कन्नड तालुक्यातील पिशोर पोलिसांनी दुचाकी चोरीच्या टोळीचा पर्दाफाश करत मोठी कारवाई केली आहे. तब्बल १४ चोरीच्या दुचाकी जप्त करत दोन मुख्य आरोपींना अटक करण्यात आली असून, सुमारे १२ लाख ७० हजार रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरात मागील काही महिन्यांपासून सुरु असलेल्या दुचाकी चोरीच्या घटनांना मोठा अडसर बसला आहे.२८ मे रोजी दीपक सकाहरी जंगले (रा. कान्हेगाव, ता. फुलंब्री) यांनी पिशोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांची स्प्लेंडर दुचाकी (क्र. एम.एच. २० जी.पी. २२९४) चोरीस गेली होती. पोलीस तपास पथकाने या गुन्ह्याचा तपास सुरू केला असता, गुप्त माहितीच्या आधारे नागापूर (ता. कन्नड) येथील नाविदोद्दीन नजीरोद्दीन शेख (वय २४) यास ताब्यात घेण्यात आले. प्राथमिक चौकशीत त्याने गुन्ह्याची



कबुली दिली.तपास अधिक खोलवर जाताच, शेख मुजाहिद शेख युनूस (रा. करीमनगर, कन्नड) या साथीदारांची नाव समोर आला. पोलिसांनी शेख मुजाहिद याला ताब्यात घेतल्यानंतर त्यांच्या ताब्यातून वरील चोरलेल्या १४ मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या. जप्त करण्यात आलेल्या वाहनांमध्ये ३ रॉयल एनफिल्ड बुलेट, ३ युनिकॉर्न, २ होंडा शाइन, ५ स्प्लेंडर व १ एचएफ डिलक्सचा समावेश आहे. या गाड्या पिशोर, कन्नड शहर व ग्रामीण, सिल्लोड, अंजिठा, फुलंब्री, एमआयडीसी व सिडको पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून चोरीस गेल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. उर्वरित चार गाड्यांचे मालक व पोलीस ठाणे अद्याप स्पष्ट झालेले नाहीत.नाविदोद्दीन शेख व शेख मुजाहिद यांना पुढील तपासासाठी कन्नड न्यायालयात हजर केले असता, त्यांना २ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. त्यांच्याकडून उर्वरित दुचाक्यांबाबत सखोल चौकशी सुरु आहे.पोलीस निरीक्षक सतिष वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे व त्यांचे तपास पथक-पोलीस उपनिरीक्षक विश्वजीत फरताडे, हवालदार विलास सोनवणे, लालचंद नागलीत, दत्तु लोखंडे, वसंत पाटील, परमेश्वर दराडे, गणेश कवाळ, पवन खंबाट, साई घुगे, कौतिक सपकाळ, संतोष घुनावत, करण म्हस्के, कल्याण बहुरे-यांनी ही कारवाई यशस्वी केली.सदर गाड्यांपैकी काही गाड्या नंबर प्लेटसह असून काही गाड्यांचे चेसिस अथवा इंजिन क्रमांक खोडलेले आहेत. नागरिकांनी अशा प्रकारच्या संशयास्पद गाड्या खरेदी करताना पूर्ण मूळ कागदपत्रांची खातरजमा करावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. कोणाच्या ताब्यात जुनी दुचाकी असून तिची कागदपत्रे नसतील, तर त्यांनी तात्काळ पोलीस निरीक्षक शिवाजी नागवे (मो. १७९७२७७४७२४) यांच्याशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंग व उपविभागीय पोलिस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली.



# राजमाता अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मदिनानिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## शैक्षणिक दर्जा राष्ट्राच्या प्रगतीचे मापदंड होय-मोहनबाबू अग्रवाल





**देवळी । प्रतिनिधी**

'कोणत्याही देशाची प्रगती ही तेथील नागरिक कसे आहेत यावर अवलंबून असते. दर्जेदार नागरिक घडविण्याकरिता दर्जेदार शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणाचा दर्जा कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीचे मापदंड असते, असे प्रतिपादन राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मदिनानिमित्त आयोजित वर्ग बारावी च्या परीक्षेत प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभात ३१ मे रोजी स्थानिक अहिल्यादेवी होळकर सभागृहात आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात ज्येष्ठ समाजसेवक तथा उद्योजक मोहनबाबू अग्रवाल यांनी केले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मोहनबाबू अग्रवाल तर प्रमुख अतिथी म्हणून मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष प्राचार्य सतीश जगताप, प्रहार समाज जागृती संस्थेचे अध्यक्ष तथा एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर, ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरम चे उपाध्यक्ष इमरान राही, माजी मुख्याध्यापक रामेश्वर लांडे, अरुण लांबाडे, समाजसेवक हसीना गोरडे, राजमाता अहिल्यादेवी होळकर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रा. राजू गोरडे मंचावर उपस्थित होते.

गेल्या तीन वर्षापासून राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयातून प्रथम स्थान प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येतो. यावर्षीही निवडक ४० गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावरील पुस्तक प्रदान करून सन्मानित करण्यात आले.याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक प्राचार्य सतीश जगताप म्हणाले आजच्या स्पर्धात्मक युगात तरुण पिढीने स्पर्धात्मक होणे जरुरी आहे तर समाजसेवी इमरान राही म्हणाले स्वतःचे कौशल्य ओळखून त्या कौशल्याला विकसित करा व स्वतःचे आगळे वेगळे स्थान निर्माण करा. रामेश्वर लांडे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांना चांगले प्रशासक बना व देश सेवा करा, अशा शुभेच्छा दिल्या.यावेळी प्रहार संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन मोहन गुजरकर यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून तरुण-तरुणींना सैन्य दलात अधिकारी होण्याबाबत मार्गदर्शन करून देशसेवेची उत्तम संधी स्वीकारण्याबाबत आवाहन केले तर हसीना गोरडे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग युवापिढी समोर ठेवून उत्तम चारित्र्यवान नागरिक व्हा, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अहिल्यादेवी होळकर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रा. राजू गोरडे यांनी उपस्थित तरुण-तरुणींना अहिल्यादेवी होळकर यांच्यासारखे उत्तम प्रशासक, समाजसेवक व आदर्श नागरिक बनण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालक श्रद्धा संत यांनी तर आभार प्रा. राजेंद्र बानमारे यांनी मानले. यशस्वीतेकरिता जितेंद्र गोरडे,सुधाकर उघडे, नितीन सुळे, नजीर शेख यांनी अथक परिश्रम घेतले.

# शहरातील पाणीपुरवठा योजनेसाठी मुल सबस्टेशनवरूनच विद्युत पुरवठा करावा

## माजी नगरसेवक मोतीलाल टहलियानी यांची आ.मुनगंटीवार यांच्याकडे मागणी

**मूल । प्रतिनिधी**

मूल शहरातील नागरिकांना नियमित आणि स्वच्छ पाणीपुरवठा व्हावा यासाठी सुरू असलेल्या वैनगंगा नदीवरील (हरनघाट) पाणीपुरवठा योजनेला सध्या बेंबाळ येथून विद्युत पुरवठा करण्यात येतो. मात्र बेंबाळ भागातील वारंवार होणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे पाणीपुरवठा विस्कळीत होत असून नागरिकांना यामुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर माजी नगरसेवक मोतीलाल ल. टहलियानी यांनी बल्लारपूरचे आमदार तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे सदर योजनेसाठी विद्युत पुरवठा थेट मुल सबस्टेशनवरून करण्यात यावा, अशी मागणी केली आहे.



टहलियानी यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, बेंबाळ सबस्टेशनमधून येणारा विद्युत पुरवठा वारंवार खंडित होतो. झाडांच्या फांद्या तुटणे, वादळी वारे, वीज पुरवठ्यातील अडथळे यामुळे पाणीपुरवठा योजना १२-१२ तास बंद राहत असून, काही वेळा एक ते दोन दिवसही पाणी मिळत नाही. ही समस्या दररोजची झाली असून, नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मूल शहरातील वाढत्या गरजांनुसार आणि नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने विचार करता, सदर जलयोजनेस अधिक सक्षम आणि सातत्यपूर्ण विद्युत पुरवठा देणे आवश्यक आहे. त्यामुळे ही योजना मुल सबस्टेशनला जोडण्यात यावी, अशी मागणी टहलियानी यांनी आपल्या पत्राद्वारे आमदार मुनगंटीवार यांच्याकडे केली आहे.

# रोहित कामडे यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या दिव्यांग सेलच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दिव्यांग सेलच्या चंद्रपूर जिल्हाध्यक्षपदी रोहित प्रकाश कामडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक योगदानाची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आली असून, नियुक्तीपत्र निताताई ढवाण (राज्य प्रमुख, दिव्यांग सेल महाराष्ट्र) यांनी अधिकृतपणे दिले.




पक्षाच्या संघटनात्मक बांधणीस हातभार लावत रोहित कामडे यांनी आतापर्यंत दिलेले योगदान लक्षात घेता त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. पक्ष मजबूत करण्यासाठी ते आपले संपूर्ण कौशल्य, वेळ आणि ऊर्जा समर्पित करतील, असा विश्वास नियुक्ती पत्रात व्यक्त करण्यात आला आहे. या प्रसंगी नितीन भटारकर (जिल्हाध्यक्ष), राजू कक्कड (शहर जिल्हाध्यक्ष), सुनील काळे (विधानसभा जिल्हाध्यक्ष), सुजित उपरे (विद्यार्थी जिल्हाध्यक्ष), पंकज ढेगारे (वैद्यकीय जिल्हाध्यक्ष), संजय सेजुल (कामगार जिल्हाध्यक्ष), अमर गोमासे (सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष) आदी मान्यवर उपस्थित होते.

रोहित कामडे हे मूळचे मूल तालुक्यातील असून, विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग राहिला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### दै.सह्याद्रीचा राखणदारच्या बातमीचा परिणाम

# रेल्वे प्रशासनाने घेतली दखल रस्त्याच्या कामाला सुरुवात



**सालोड । प्रतिनिधी**

सालोड, भैय्यापूर, श्यामपूर शिवारातील शेतकऱ्यांनी रस्त्याच्या प्रश्नावर दिलेल्या रेल्वे रोको इशाऱ्यानंतर, २७ मे रोजी दैनिक सह्याद्रीचा राखणदा मध्ये एक रेल्वे विभाग निद्रा अवस्थेतून जागून शेतकऱ्यांना रस्ता देईल का? या मथळ्याखाली बातमी प्रकाशित झाली होती. या प्रभावी बातमीची गंभीर दखल घेत रेल्वे प्रशासनाने अखेर हालचाल करत रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे.

वर्धा-कळब रेल्वेमार्गावरील सालोड क्रॉसिंगपासून नागठाण्याकडे जाणारा पांधन रस्ता रेल्वे ट्रॅक टाकताना पूर्णपणे नष्ट झाला होता. गेल्या दोन वर्षांपासून या रस्त्याच्या अभावामुळे २०० ते ३०० शेतकऱ्यांना आपल्या शेतात पोहोचणे अत्यंत कठीण झाले होते. पावसाळ्याच्या तोंडावर परिस्थिती आणखी बिकट झाली होती.शेतकऱ्यांनी वारंवार निवेदने दिली, रेल्वे अधिकाऱ्यांनी पाहण्या केल्या, आश्वासने दिली गेली,


दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
रेल्वे विभाग निद्रिस्त अवस्थेतून जागा होईल का?
सालोड-भैय्यापूर-श्यामपूर शिवारातील शेतकऱ्यांचा रेल्वे रोकोचा इशारा

पण प्रत्यक्ष कामाला सुरूवात होत नव्हती. अखेर दैनिक सह्याद्रीचा राखणदार मध्ये ठळक आणि प्रश्न विचारणाऱ्या पत्रकारितेने या प्रश्नाला वाचा फोडली आणि चार दिवसांतच काम सुरू होण्यास भाग पाडले.सध्या रस्त्याच्या खडीकरणाचे काम सुरू झाले असून, शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.या घडामोडींमुळे स्थानिक शेतकऱ्यांनी दैनिक सह्याद्रीचा राखणदार पत्रकारितेचे कौतुक करत हीच खरी जनतेची ताकद असलेली पत्रकारिता अशा शब्दांत प्रतिक्रिया दिली.

### रणजितसिंह मोहिते पाटील ही एक लाचार प्रवृत्ती

# भाजपमधील त्यांचा विषय केव्हाच संपला भाजप नेते राम सातपुते यांची झोंबणारी टीका

**सोलापूर (वृत्तसंस्था)**-रणजितसिंह मोहिते पाटील ही एक लाचार प्रवृत्ती आहे. त्यांचा भाजपमधील विषय संपला आहे. कदाचित एखाद्याला हकालपट्टी करून कशाला मोठे करायचे असा विचार पक्ष करत असेल, अशा शब्दांत भाजप नेते राम सातपुते यांनी शुक्रवारी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्यावर निशाणा साधला आहे.भाजप प्रदेशाध्यक्ष नुकतेच सोलापूरच्या दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांना आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्यावरील कारवाईविषयी प्रश्न करण्यात आला होता. त्यावेळी मोहिते पाटलांनी आपली मान खाली घातली होती. राम सातपुते यांनी या घटनाक्रमावरून मोहिते पाटलांवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या मान खाली घालण्याच्या कृतीवर मी भाष्य करणार नाही. मुळात ती लाचार प्रवृत्ती आहे. त्यावर मी काय बोलणार? आता त्यांचा भाजपमधील विषय संपला आहे.एखाद्याला हकालपट्टी करून कशाला मोठे करायचे, हा विचार कदाचित भाजप करत असेल. चंद्रशेखर बावनकुळे



यांनी मोहिते पाटलांविषयीचा अहवाल पक्षाच्या केंद्रीय समितीकडे पाठवल्याचे मला सांगितले आहे, असे ते म्हणाले.राम सातपुते पुढे म्हणाले, रणजितसिंह मोहिते पाटलांना भाजपच्या जिवावर आमदारकी भेटली होती. त्यांची आमदारी काढायची असेल किंवा त्यांच्यावर कारवाई करायची असेल तर त्याविषयी एक शिस्तपालन समिती असते. त्यानुसार मोहिते पाटलांवरील कारवाईचा विषय केंद्रीय शिस्तपालन समितीकडे पाठवण्यात आला आहे. पण त्यांनी भाजपला काय दिले? त्यांची काम करण्याची पद्धत कशी आहे? ते कशा पद्धतीने गद्दारी करू शकतात? हे आता भाजपच्या लक्षात आले आहे. त्यामुळे भाजप येत्या काळात रणजितसिंह मोहिते पाटील यांच्यावर कारवाई करेल आणि ती केलीच पाहिजे असे माळशिरस तालुक्यातील भाजप कार्यकर्त्यांची भावना आहे.

मोहिते पाटील आतापर्यंत आम्ही असे, आम्ही तसे असे म्हणत होते. पण आम्ही त्यांच्या नाकाखालून १ लाख ८ हजार मते मिळवली. त्यामुळे माळशिरसच्या जनतेला कोण कामाचा माणूस हे समजले आहे. भविष्यातही आम्ही संघर्ष करत राहू. राम सातपुते हा एखाद्या पराभवाने किंवा दुःख कुरवाळत बसत नाही. मी लढणारा कार्यकर्ता आहे. याऊल मोहिते पाटील एक लाचार प्रवृत्ती आहे. राम सातपुते अशा प्रवृत्ती व विकृतीच्या विरोधात काय लढा देत राहील. मुळात मी माझी ताकद विधानसभा निवडणुकीत दाखवू दिली आहे, असे ते म्हणाले.

# जीवनात येणाऱ्या अडचणींना संधीत रूपांतरित करता आले पाहिजे, कॅप्टन मोहन गुजरकर

## आम्ही 'बी' घडलो, तुम्ही 'बी' घडाणा-ग्रामीण युवा मंडळाचा स्तुत्य उपक्रम

**वर्धा । प्रतिनिधी**

'तरुणांनी ध्येय वेडे असले पाहिजे. केवळ ध्येय समोर ठेवून चालत नाही तर योग्य नियोजन, अथक परिश्रम व चिकाटीची गरज आहे. ध्येयपूर्ती करताना अनेक अडचणी येणारच आहे. पण अडचणींवर मात करणे मनुष्यधर्म आहे. येणाऱ्या अडचणींना संधीत रूपांतरित करता आले पाहिजे, असे प्रतिपादन प्रहार समाज जागृती संस्थेचे अध्यक्ष तथा एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर यांनी चिखली ग्राम येथे विद्यार्थ्यांच्या गुणगौरव तथा करिअर गायडन्स कार्यक्रमात २८ मे रोजी ग्रामपंचायत सभागृहात केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कॅप्टन मोहन गुजरकर तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ नागरिक विनोद घोडे, ग्रा.पं. सदस्य नंदा चिचाम, ग्रा.पं. सदस्य आरती डायरे, अभियंता अभिलाष घोडे, सॉफ्टवेअर डिझायनर मृणाल डहाके व चिकणी युवा आदर्श ग्राम समितीचे





अध्यक्ष भाविक आखूड उपस्थित होते. आजच्या आधुनिक युगात संताच्या विचारांचा समाजाला विसर पडत चालला आहे. मात्र चिकणी येथिल युवकांनी याच संताच्या विचारांचा प्रसार व्हावा व समाजामध्ये क्रांती घडविण्याच्या दृष्टीने नवे पाऊल उचलले आहे. युवा आदर्श ग्राम समिती चिकणी द्वारा आयोजित गावातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आम्ही 'बी' घडलो, तुम्ही 'बी' घडाना हा करीअर मार्गदर्शन कार्यक्रम व दहावी बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. याप्रसंगी युवा अभियंता अभिलाष घोडे यांनी आपल्या यशाचे रहस्य सांगून यशाचा मार्ग कठीण नाही तर निरंतर परिश्रम व सातत्य हा आहे तर युवा सॉफ्टवेअर डिझायनर मृणाल डहाके म्हणाली ग्रामीण भागातील तरुण-तरुणींमध्ये सुद्धा भरपूर कौशल्य आहे. आपले कौशल्य ओळखून प्रगती केली पाहिजे. युवा आदर्श ग्राम समितीचे तरुण अध्यक्ष भाविक आखुड याने प्रास्ताविक भाषणात सांगितले की, गाव खेड्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जिवन सुधारायचे असेल तर त्यांना योग्य मार्गदर्शनाची तसेच संधी उपलब्ध करुन देण्याची नितांत गरज आहे.कार्यकरमाचे सूत्रसंचालन माहेश्वरी इंगोले व राखी मानिकपुरे यांनी केले तर आभार यशस्वी कांबळे हिने मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी किरण कांबळे, नेहा डफरे, प्रतिक्षा शंभरकर, तेजस्विनी घोडे, प्राजक्ता उपासे, मृणाली डहाके, ईश्वरी परचाके सारिका डायरे, शुभम माणिकपूरे, रोहन आखुड, सौरभ ठाकरे व युवा मंडळाचे सदस्य यांनी अथक प्रयत्न केले.

# गांते यांची भाजप वर्धा जिल्हाध्यक्षपदी निवड संघटनशक्ती, अनुभव व जनसेवेचा सन्मान



**पुलगाव । अविनाश भोपे**

पुलगाव येथील ज्येष्ठ आणि निष्ठावान कार्यकर्ते संजय गजाननराव गांते यांची भारतीय जनता पक्षाच्या वर्धा जिल्हाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीने संपूर्ण जिल्ह्यात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, ही निवड त्यांच्या संघटन कौशल्य, दीर्घकालीन सामाजिक कार्याचा अनुभव आणि प्रामाणिक नेतृत्वगुणांची पावती मानली जात आहे.संजय गांते यांचे कार्यकर्तृत्व लहान वयातच सुरू झाले. १९८९ ते १९९२ या कालखंडात त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पुलगाव येथील समर्थ सायम शाखेत गटनायक ते मुख्य शिक्षक म्हणून कार्य केले. संघाच्या शिस्तबद्ध संस्कारातून घडलेले त्यांचे व्यक्तिमत्त्व पुढे विद्यार्थी परिषद, सामाजिक संस्था व राजकारणात प्रभावी ठरले.१९९३ ते २००० या कालावधीत त्यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेमध्ये नगर संघटक, भाग संघटक, जिल्हा संघटक तसेच विदर्भ प्रांत सहमंत्री अशा विविध पदांवर काम केले. विद्यार्थी आणि युवकांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक जागृती आणि नेतृत्व विकासासाठी त्यांनी उल्लेखनीय कार्य केले.२००७ ते २०१३ या कालावधीत संजय गांते यांनी भाजपच्या देवळी तालुका सरचिटणीस पदाची जबाबदारी सांभाळली. त्यानंतर २०१३ ते २०१६ पर्यंत ते वर्धा जिल्हा चिटणीस होते. या काळात त्यांनी पक्षवाढ, संघटन बळकटीकरण आणि कार्यकर्त्यांमधील संवाद यावर विशेष भर दिला.२०११ ते २०१६ या कालखंडात पुलगाव नगर परिषदेत नगरसेवक म्हणून कार्यरत राहून त्यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न केले. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि आरोग्य यासारख्या मूलभूत सुविधा प्रभावीपणे राबवल्या.संजय गांते हे महाराष्ट्र कुंभार समाज महासंघाचे वर्धा जिल्हाध्यक्ष (२००९-२०१२), विदर्भ विभागीय अध्यक्ष (२०१२-२०१४) आणि २०१४ ते २०२० या कालखंडात महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष होते.

२० जानेवारी २०१४ रोजी वर्धा येथे त्यांनी २० हजार कुंभार समाज बांधवांच्या उपस्थितीत भव्य मेळाव्याचे



आयोजन केले. या मेळाव्यास माजी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.

५ मार्च २०१८ रोजी आजाद मैदान, मुंबई येथे १ लाख समाजबांधवांच्या सहभागाने संत शिरोमणी गोरोबा काका माती कला बोर्डाच्या स्थापनेसाठी भव्य आंदोलन करण्यात आले. या मागणीला प्रतिसाद देत अर्थमंत्री मा. सुधीर मुनगंटीवार यांनी ९ मार्च २०१८ रोजी बोर्ड स्थापनेची घोषणा करून रु. १० कोटींची तरतूद केली. मात्र, दुर्दैवाने २०१९ साली महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर बोर्डचे कार्य पुढे सरकले नाही.२०१६ ते २०२३ या कालावधीत संजय गांते भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस होते. ७ जुलै २०२३ पासून त्यांनी मोर्चाचे प्रदेशाध्यक्षपद भूषवले आहे. राज्यभरात ओबीसी समाजाचे संघटन, प्रश्न मांडणी आणि नेतृत्व विकासासाठी त्यांचे योगदान लक्षणीय ठरले आहे.संजय गांते हे मातृसेवा मंडळाचे कार्यवाह असून, सेवा फाउंडेशनचे मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. पुलगाव शहरात आरोग्य तपासणी शिबिरे, वृक्षारोपण, शिक्षणवृत्ती वाटप, स्वच्छता मोहीम यांसारख्या उपक्रमांमध्ये ते सातत्याने सक्रीय असतात.संजय गांते यांची जिल्हाध्यक्षपदावरील निवड ही त्यांच्या दीर्घ सेवाभाव, समर्पित कार्यशैली आणि संघटनशक्तीची दखल आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे वर्धा जिल्ह्यात भाजप अधिक मजबूत होईल, कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल आणि पक्षाचे कार्य ग्रामीण तसेच नागरी भागात अधिक प्रभावीपणे पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.जिल्हाभरातून त्यांचे अभिनंदन होत असून, अनेक पक्षनेते, कार्यकर्ते आणि समाजबांधवांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## ग्रामपंचायत तांबा समोरील धोकादायक पाण्याची टाकी तातडीने पाडा-स्थानिक नागरिकांची मागणी

**तांबा । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत तांबा कार्यालयासमोर असलेली जुनी पाण्याची टाकी नागरिकांच्या जिवावर बेतण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सदर टाकी पूर्णतः जीर्ण अवस्थेत असून, त्यातील सिमेंटचे तुकडे, लोखंडी पाईप्स खाली कोसळत आहेत. परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, तातडीने टाकी पाडण्यात यावी, अशी मागणी जोर धरत आहे.

तंठा मुक्ती अध्यक्ष गणेश शामरावजी मेश्राम यांनी याबाबत ग्रामपंचायतीकडे लेखी निवेदन दिले आहे. त्यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, सदर टाकी कोसळण्याच्या मार्गावर असून त्याचा थेट धोका आजूबाजूच्या घरांना आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला आहे. काही मटेरियल खाली



पडत असून कुठल्याही क्षणी मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या टाकीच्या आसपास राहणाऱ्या नागरिकांमध्ये अशनूर शहा, किशोर वाघाडे, विनोद वाघाडे, संदीप वाघाडे, सुरेश उईके, प्रवीण हजारे, हनुमान धांदे, गजानन डडमल आणि दत्तूजी रगड यांचा समावेश आहे. या सर्वांनी प्रशासनाकडे टाकी तातडीने पाडण्याची मागणी केली आहे.महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तांबा गाव शाखेचे अध्यक्ष प्रमोद मडावी यांनीदेखील सदर ठिकाणी पाहणी करून प्रशासनाकडे लेखी मागणी केली असून, कोणताही अनुचित प्रकार होण्यापूर्वी प्रशासनाने त्वरित पावले उचलावीत, असे ते म्हणाले.स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे निवेदनाद्वारे तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली असून, योग्य त्या उपाययोजना लवकरात लवकर करण्यात याव्यात, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

## धामणगाव रेल्वेत बालसंस्कार व व्यक्तिमत्त्व विकास शिबिर यशस्वीरीत्या पार

### कामगार कल्याण मंडळाचे मोलाचे योगदान

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, गट कार्यालय अमरावती अंतर्गत कार्यरत कामगार कल्याण केंद्र, धामणगाव रेल्वे येथे दि. २० मे ते ३० मे २०२५ या कालावधीत गटस्तरीय बालसंस्कार व व्यक्तिमत्त्व विकास शिबिर यशस्वीपणे संपन्न झाले. या शिबिराचे आयोजन उपकल्याण आयुक्त (मुंबई व नागपूर/अकोला विभाग) नंदलाल राठोड आणि कामगार कल्याण अधिकारी (अमरावती गट) प्रतिभा भाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

दहा दिवसांच्या या शिबिरात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांनी सत्र घेतली. डॉ. प्रियंका बोरगे, मीरा बडवाई, ओझा काका, गौरव वानखडे, खोलकुठे सर, श्रीपाल




राऊत, निलेश वानखडे, नीलिमा बोकडे, रुपाली ठोकर, धनश्री ठोकर, सागर ठाकरे, सचिन कुऱ्हेकर, सरोज आवारे व निता वरकड यांचे विशेष सहकार्य लाभले.

शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दिनेश बोबडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कमलकिशोर छांगाणी, सचिन कुऱ्हेकर, सरोज आवारे, डॉ. प्रियंका बोरगे आणि किशोर बागवान यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना जीवनात सकारात्मक दृष्टिकोन, आत्मविश्वास आणि उत्तम व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतीक्षा प्रजापती यांनी केले, तर प्रास्ताविक केंद्र संचालक विनोद इंगळे यांनी केले. स्वाती धामंडे यांनी आभार प्रदर्शन केले. उपस्थित मान्यवरांनी शिबिराचे महत्त्व विशद करताना विद्यार्थ्यांना चारित्र्य घडवणाऱ्या मूल्यांचे महत्त्व पटवून दिले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माधुरी गवळी, अनिता गजभिये, नरेंद्र नांदुरकर, प्रतीक्षा प्रजापती, मेघा नांदुरकर, सरोज कुथे, राधिका भिवरेकर, हर्षवर्धन वरखड आणि आर्या वरखड यांनी परिश्रम घेतले.

### कर्जाच्या विवंचनेत शेतकरी पुत्राची आत्महत्या

## नादरपूर शिवारातील गट क्र. १४८ मध्ये चिंचोऱ्याच्या झाडाला गळफास

**पिशोर (जावेद शेख)**

कन्नड तालुक्यातील नादरपूर येथील गट क्रमांक १४८ मधील शेतात एका ३९ वर्षीय शेतकरी पुत्राने चिंचोऱ्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी (३० मे) सायंकाळी साडेपाच वाजता उघडकीस आली.मृत व्यक्तीचे नाव सोपान कचरु निकम (वय ३९) असे आहे. नादरपूर शिवारातील सोंडा परिसरात त्यांच्या शेताजवळील चिंचोऱ्याच्या झाडाला दोरीच्या साहाय्याने त्यांनी गळफास घेतल्याचे शेजारील शेतकऱ्यांच्या लक्षात आले. याबाबतची माहिती पोलीस पाटील रामकिसन सांडू सोनवणे यांना देण्यात आली. तत्काळ नातेवाईकांनी त्यांना खाली उतरवून नाचणवेल येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले असता, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले.शनिवार, ३१ मे रोजी सकाळी शवविच्छेदन करून नादरपूर येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



सोपान निकम यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई-वडील असा परिवार आहे. त्यांच्यावर काही बँक कर्ज तसेच खासगी उसणवार देणी असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.या प्रकरणी पिशोर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास सपोनि शिवाजी नागवे यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार किरण गंडे करीत आहेत.

## धामणगाव रेल्वे स्थानकावर राजस्थान एक्सप्रेसचा थांबा सुरू; सल्लागार समितीच्या प्रयत्नांना यश

**धामणगाव रेल्वे । प्रशांत मुन**

धामणगाव रेल्वे स्थानकावरून राजस्थानकडे जाणाऱ्या चेन्नई-भगत की कोठी (जोधपूर) एक्सप्रेस (गाडी क्र. १२२२५/१२२२६) या गाडीचा थांबा अखेर निश्चित करण्यात आला आहे. अनेक वर्षांपासून ही मागणी सातत्याने मांडणाऱ्या रेल्वे सल्लागार समितीच्या प्रयत्नांना यश आले असून, प्रवाशांसाठी ही एक अत्यंत आनंददायक आणि सोयीची सुविधा ठरणार आहे.या संदर्भात माहिती देताना सल्लागार समितीचे सदस्य कमल छांगाणी यांनी सांगितले की, या थांब्यासाठी विविध बैठकीत ठोस पाठपुरावा करण्यात आला होता. अखेर हा थांबा निश्चित झाल्याने स्थानिक प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.

त्यांनी यासोबतच आणखी काही







महत्त्वाच्या मागण्यांची माहिती दिली. यामध्ये धामणगाव स्थानकावर कोच इंडिकेटर बसवणे, दोन्ही प्लॅटफॉर्मवर प्रवाशांसाठी मोठ्या शेडचे बांधकाम, प्लॅटफॉर्म क्र. १ वरून २ वर जाण्यासाठी लोखंडी पूल (ऋजइ) उभारणे, गौरक्षणजवळ दुसरा अंडर ब्रिज (भुयारी मार्ग) तयार करणे.या मागण्यांची पूर्तता लवकरच होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**गाडीचा थांबा कधी?**

चेन्नईहून जोधपूरकडे जाणारी १२२२५ एक्सप्रेस आता आठवड्यातून पाच दिवस

दुपारी १२.०२ वाजता धामणगाव स्थानकावर थांबेल.

तर जोधपूरहून चेन्नईकडे येणारी १२२२६ एक्सप्रेस

पहाटे ५.४२ वाजता धामणगावला थांबेल.

या निर्णयामध्ये माजी खासदार व रेल्वे बोर्डाचे तत्कालीन सदस्य रामदास तडस आणि आमदार प्रताप अडसड यांचे मोलाचे योगदान असल्याचे छांगाणी यांनी नमूद केले. त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळेच हा थांबा मंजूर झाला.या निर्णयाबद्दल रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य कमल छांगाणी, अर्चना राऊत, दिनेश बोबडे, सुनील साकुरे, दिनेश मुंदडा यांनी रेल्वे प्रशासनासह स्थानक प्रमुख डी.आर. मुदलियार यांचे मन:पूर्वक आभार मानले.

## वर्धा आणि गडचिरोली नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात दारू बंदी लागू करा; सर्व सेवा संघ सदस्यांची ठाम मागणी

**वर्धा । प्रतिनिधी**

आज दिनांक ३१ मे रोजी वर्धा येथील स्वराज्य भवन येथे दारूमुक्ती आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष व राज्य संयोजक भाई रजनीकांत यांच्या प्रमुख उपस्थितीत, दूरदृश्य प्रणालीद्वारे (व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे) महाराष्ट्र सरकारच्या महिला विरोधी मुक्त दारु धोरणावर सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीत जिल्ह्यातील विविध कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला.बैठकीत सर्व सेवा संघाचे सक्रिय सदस्य, गांधी विचार व स्वदेशी प्रचारक ज्ञानेश्वर ढगे यांनी स्पष्टपणे सांगितले की, वर्धा व गडचिरोली जिल्ह्यांमध्ये ५०-५१ वर्षांपासून कायदेशीर दारूबंदी असली तरी प्रत्यक्षात देशी, विदेशी व हातभट्टीची दारू सहज उपलब्ध आहे. त्यांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींवर निष्क्रियतेचा ठपका ठेवत म्हटले की, ही स्थिती गांधी विचारांबद्दलच्या अनास्थेचे द्योतक आहे. ढगे पुढे म्हणाले की, या व्यसनामुळे गेल्या पाच दशकांमध्ये शेकडो लोक मृत्युमुखी पडले आहेत, अनेक महिला विधवा झाल्या आहेत, तरुणांना रोजगाराभावी व्यसनाधीनता वाढली आहे. त्यांच्या मते, दारू विक्री हे अनेक बेरोजगारांचे उपजीविकेचे साधन बनले असले तरी सरकारची प्राथमिक



जबाबदारी ही रोजगार निर्मितीची आहे.ज्ञानेश्वर ढगे यांनी बिहारच्या धर्तीवर संपूर्ण महाराष्ट्रात कडक कायद्याने दारूबंदी लागू करण्याची मागणी केली. तसेच वर्धा जिल्ह्यातील गांधी विचारधारेतील सर्व कार्यकर्त्यांचे संमेलन बोलावून दारूबंदी कायद्याची ठोस मागणी सरकारकडे करावी, असे आवाहनही त्यांनी केले.या बैठकीत भाई रजनीकांत यांनी सांगितले की, वाशिम व अमरावती जिल्ह्यांतील काही सत्ताधारी आमदारांच्या निवासस्थानी व त्यांच्या मतदारसंघात बिनधास्तपणे अवैध दारू विक्री सुरू आहे. त्यांनी ३० जूनपर्यंत या दारू विक्रीवर बंदी घालावी, अन्यथा करा दारूबंदी, नाहीतर करू गावबंदी असा तीव्र इशारा दिला.

भाई रजनीकांत म्हणाले की, सद्याचे मुक्त दारू धोरण केवळ सत्ताधारी पक्षासाठी नव्हे तर विरोधी पक्षातील दारू कारखानदार आमदार, मंत्रीही जबाबदार आहेत. त्यांनी संपूर्ण राज्यात घराघरातून सत्याग्रह सुरू करून गांधीजींच्या विचारांनुसार जनतेकडून सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याची घोषणा केली.या बैठकीत अनेक मान्यवर उपस्थित होते व त्यांनी या मागण्यांचे जोरदार समर्थन केले. उपस्थित मान्यवरांमध्ये गजानन जिकार,विजयाबाई रोकडे,कौसल्याबाई लढी (माजी आदर्श सरपंच),पुष्पाताई झाडे (दारूबंदी नेत्या),रमेश झाडे (अध्यक्ष, वर्धा जिल्हा सर्वोदय मंडळ),अशोक अण्णाजी सोरटे (अध्यक्ष, वर्धा जिल्हा दारूमुक्ती आंदोलन),गजेंद्र सुरकार (राज्य कार्यवाह, अंधश्रद्धा निर्मूलन समिती),सागरराव कोल्हे, वसंतराव चांभारे, सिंधूबाई ठाकरे (माजी सरपंच),पुरुषोत्तम थुटे, चंद्रकांत ढगे, सचिन ढगे, योगेश राऊत (राष्ट्रीय युवा संघटन),प्रिया वानखडे यांनी सहभाग घेत संपूर्ण महाराष्ट्रात दारूबंदीच्या लढ्यात सक्रिय सहभागी होण्याचा संकल्प जाहीर केला

## देवळी शहरात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळा संपन्न

**स्वच्छता अभियान, जलपूजन, चित्रप्रदर्शनी व चित्रकला स्पर्धेच्या माध्यमातून राजमातांना अभिवादन**

**देवळी । प्रतिनिधी**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त देवळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास पद्मश्री मा. खासदार डॉ. विकास महात्मे, मा. खासदार रामदास तडस आणि आमदार राजेश बकाणे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.



कार्यक्रमात स्वच्छता अभियान, महापूजन व जलपूजन, चित्रप्रदर्शनी तसेच चित्रकला स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले. चित्रप्रदर्शनीचे उद्घाटन आणि चित्रकला स्पर्धेच्या बक्षीस वितरणाचे कार्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पद्मश्री डॉ. विकास महात्मे यांनी राजमाता अहिल्याबाईंच्या कार्याचा गौरव करताना सांगितले, राजमातांनी केवळ एक महिला शासक म्हणून नव्हे, तर हिंदू संस्कृतीच्या संवर्धनासाठी घेतलेले निर्णय अत्यंत मोलाचे होते. त्यांनी घाट, मंदिरे, तीर्थक्षेत्रे यांचे जीर्णोद्धार करून ऐतिहासिक वारसा जपला.

त्यांनी असेही नमूद केले की, राज्यसभेचे सदस्य असताना मी महाराष्ट्रात ६१ पेक्षा अधिक 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर भवन' स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला.खासदार रामदास तडस यांनी सांगितले, राजमातांचे कार्य हे केवळ होळकर घराण्यासाठी नव्हे, तर संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी होते. त्या एक कुशल प्रशासक व द्रष्ट्या नेत्या होत्या.

त्यांनी सरकारवर टीका करत म्हटले, काँग्रेसच्या काळात त्यांच्या कार्याला योग्य प्रतिष्ठा मिळाली नाही. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजप सरकारने त्यांच्या स्मृतींना उजाळा देत समाजात त्यांचे विचार पोहचवले आहेत.आमदार राजेश बकाणे म्हणाले, राजमातांनी घेतलेले निर्णय सर्व समाजासाठी आदर्श आहेत. त्यांच्या कार्याचा प्रसार सर्वांपर्यंत होणे गरजेचे आहे.त्यांनी सांगितले की, धनगर समाजासाठी असलेल्या अनेक योजनांची माहिती सर्वसामान्यांना होण्यासाठी देवळी-पुलगाव मतदारसंघात विशेष प्रयत्न केले जातील.प्रास्ताविक अर्चनाताई वानखेडे यांनी करताना अहिल्याबाईंच्या जीवनावर प्रकाश टाकला. जसे छत्रपती शिवाजी महाराज पुरुषांतील उत्तम शासक होते, तसे अहिल्याबाई महिलांतील आदर्श राज्यकर्त्या होत्या, असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे संचालन किशोर गव्हाळकर, तर आभार प्रदर्शन दशरथ भुजाडे यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वप्नील खडसे, जयश्री मोकदम, राजू चिटकुले, उमेश कामडी, इंगोले सर, श्रीधर लाभे, गजानन दुतारे, प्रभाकर ढोक, सुनिल उपासे, मारोती पोराटे, केशव निखार, नाना थोटे, रविंद्र उपासे, नरेंद्र धोटे, बंडू डाहाके, नितीन होटे, संजय गराड, विलास थोटे, अंकित टेकाडे, पंढरी वैद्य, अक्षय गावंडे, किरण सरोदे, बंडू भिडकर, अनिल वैद्य आदींनी मोलाचे सहकार्य केले.कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती लावून उत्सवात सक्रिय सहभाग घेतला.

## अहिल्यादेवीचे विचारांशी सुसंगत असा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

# जनसेवा फौंडेशन, विचार भारती यांनी सामाजा समोर आणला आहे-डॉ.राधाकृष्ण विखे पाटील





**अहिल्यानगर ।प्रतिनिधी**

अहिल्यादेवीच्या विचारांशी सुसंगत असा सांस्कृतिक महोत्सव आयोजित करून जिल्ह्यचा सांस्कृतिक नावलौकीक अधिक उंचावण्याचा यशस्वी प्रयत्न विचार भारती आणि जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून झाला असल्याचे गौरवोद्गार जलसंपदा तथा पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी काढले.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या तिनशेव्या जयंतीचे औचित्य साधून विचार भारती आणि जनसेवा फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अहील्यानगर गौरव आणि पालकमंत्री महोत्सवाचे उद्घाटन ना.विखे पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, अहील्यादेवी होळकर यांचे नाव देवून जिल्ह्याचा गौरव झाला.मात्र अहील्यादेवी मांडलेल्या विचारांचा वस्तूपाठ नव्या पिढी समोर आणायचा असेल तर त्यांच्या विचाराने आपल्याला वाटचाल करावी लागेल.अहील्यादेवी होळकर यांचा जीवनपट भारतीय इतिहासातील एक तेजस्वी अध्याय असल्याचा उल्लेख करून मंत्री विखे पाटील म्हणाले की,त्यांचे कार्य केवळ राज्यापुरते सिमीत नव्हते तर संपूर्ण भारत वर्षासाठी प्रेरणादायी ठरले.धर्म न्याय आणि सामाजिक सुधारणा आणि भारतीय संस्कृतीचे पुनरूत्थान करण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे.जिल्ह्याचा सुपूत्री असल्याचा अभिमान आपल्या सर्वांना आहेच,परंतू यापेक्षाही महत्वाचे म्हणजे सामाजिक सुधारणातून महीलांच्या सबलीकरणाचा पाया त्यांनी अधिक मजबूत केला.हीच प्रेरणा घेवून शहरामध्ये त्यांचे भव्य स्मारक उभारून महीलासांठी काम सूरू करणार असल्याचे सुतोवाच पालकमंत्री विखे पाटील यांनी केले. जिल्हयाला लाभलेला सांस्कृतिक वारसा या महोत्सवातून अधोरेखीत झाला असून,जिल्हयातील कलाकारांनी यामध्ये दिलेलै योगदान खूप कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.अहील्यादेवीच्या प्रत्येक जयंतीदिनाला असा महोत्सव आयोजित करून हा जिल्हा अहील्यादेवी होळकर यांच्या विचारांवर वाटचाल करणारा असल्याचा संदेश देण्यासाठी भविष्यात प्रयत्नशील राहण्याची ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली.महोत्सवात झालेल्या यशस्वी स्पर्धक आणि कलाकारांचा मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला.कार्यक्रमास विचार भारतीचे राजाभाऊ मुळे अरूण कुलकर्णी महोत्सव समितीच्या सौ.धनश्री विखे पाटील माजी महपौर बबासाहेब वाकळे,निखिल वारे,धनंजय जाधव यांच्यासह विचार भारतीचे तसेच महोत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

## मुंबई पोलिसांची मोठी कारवाई

# बनावट नोटा छापणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश; तेलंगणा कनेक्शन समोर

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई पोलिसांनी बनावट नोटा बनवणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. घटनेबाबत अधिक माहिती अशी की, मुंबईच्या मालवणी पोलिसांनी ही कारवाई केली आहे. या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, पाचशे रुपयांच्या बनावट नोटा, लॅपटॉप, इंक आणि कलर प्रिंटरसह लाखो रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. मालवणी पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक दीपक हिंडे यांना याबाबत गुप्त माहिती मिळाली होती. काही लोक मालवणीतील साई बाबा मंदिराजवळ बनावट नोटांचा व्यापार करण्यासाठी येणार असल्याची माहिती त्यांना मिळाली होती.

माहिती मिळताच, वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या नेतृत्वाखाली एक पथक तयार करण्यात आले आणि आरोपींना ५०० रुपयांच्या बनावट नोटांसह रंगेहाथ अटक करण्यात आली. त्यांच्याकडून बनावट ५०० रुपयांच्या १७४० नोटा, नोटा छापण्याचे यंत्र, लॅपटॉप आणि इतर लाखो रुपयांचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणात पोलिसांनी दोन आरोपींना अट केली आहे.संपत सामवय्या एंजलपल्ली (४३) आणि रहीमपाशा याकूब शेख (३०) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावं आहेत. हे दोघेही तेलंगणाचे रहिवासी आहेत. पोलिसांनी या आरोपींकडून २३ लाख ३० हजार रुपयांच्या बनावट नोटा जप्त केल्या आहेत. मालवणी पोलिसांनी या प्रकरणात दोन आरोपींना अटक केली आहे, आता त्यांचे नेटवर्क किती राज्यांमध्ये पसरलेले आहे? त्यांच्याशी आणखी किती लोक जोडले आहेत याचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याचं पोलिसांनी सांगितलं.या घटनेमुळे खळबळ उडाली आहे, आरोपींकडून तब्बल ५०० रुपयांच्या १७४० बनावट नोटा जप्त करण्यात आल्या आहेत. तसेच इतरही साहित्य जप्त करण्यात आलं आहे.

# 'लाडकी'साठी निधी पळवल्याचा आरोप खोटा अर्थसंकल्प कळत नसेल तर माझ्याकडे या

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विरोधकांना टोला



**परभणी (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी आदिवासी विभागाचा निधी पळवल्याचा आरोप धुडकावून लावला आहे. लाडकी बहीण योजनेसाठी निधी वळवल्याचा आरोप अतिशय चुकीचा व खोटा आहे. ज्यांना अर्थसंकल्पाची मांडणी कळत नाही तेच असे आरोप करतात. अर्थसंकल्प न कळणाऱ्यांनी माझ्याकडे यावे, असे त्यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज परभणी व हिंगोलीच्या दौऱ्यावर आहेत. पत्रकारांनी परभणी येथे त्यांना लाडकी बहीण योजनेसाठी आदिवासी विभागाचा सुमारे ३३५ कोटी ७० लाखांचा निधी पळवल्याच्या आरोपांविषयी विचारणा केली. त्यावर बोलताना त्यांनी या आरोपांत कोणतेही तथ्य नसल्याचे ठणकावून सांगितले. लाडकी बहीण योजनेसाठी आदिवासी विभागाचा निधी वळवल्याचा आरोप अतिशय चुकीचा व खोटा आहे. अर्थसंकल्पाची मांडणी ज्यांना कळत नाही, तेच अशा प्रकारचे आरोप करतात. कारण, अर्थसंकल्पाच्या नियमानुसार वैयक्तिक लाभासाठी जो निधी दिला जातो, तो आदिवासी विभाग तथा अनुसूचित जाती व सामाजिक न्याय विभागातच तो दाखवावा लागेल. या प्रकरणी अर्थमंत्री अजित पवार यांनीही सभागृहात तसा खुलासा केला आहे, असे ते म्हणाले.ते पुढे म्हणाले, आदिवासी विभागाचे बजेट पावणे दोन पटींनी वाढले आहे. त्यामुळे ही अकाउंटिंगची पद्धत आहे. कोणताही पैसा पळवलेला नाही. कोणताही पैसा वळवलेला नाही. अर्थसंकल्प ज्यांना कळत नाही, त्यांनी माझ्याकडे यावे. अर्थसंकल्प कसा वाचावा? हे पुस्तक मी लिहिलेले आहे. ते पुस्तक मी त्यांना देईन.

# १० हजारांच्या मुदत ठेवीच्या माध्यमातून राज्यातील १२ हजार पत्रकारांना प्रतिबिंब चे २ लाखांचे विमा कवच!

## उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचा महत्वकांक्षी संकल्प

### 'प्रतिबिंब प्रतिष्ठान'चे भव्य लोकार्पण आणि 'महाराष्ट्र महागौरव पुरस्कार २०२५' समारंभ उत्साहात संपन्न






**दैनिक राज आनंद । पुणे । प्रतिनिधी**

डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना, महाराष्ट्र यांच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या 'प्रतिबिंब प्रतिष्ठान' या सामाजिक उपक्रमाचे भव्य लोकार्पण आणि 'महाराष्ट्र महागौरव पुरस्कार २०२५' समारंभ रविवारी पुण्यातील गथ चर्रीर्ळेीं हॉटेल येथे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रेरणादायी वातावरणात पार पडला. पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी नेहमीच कटिबद्ध आहे, अशी भावना यावेळी पाटील यांनी व्यक्त केली.यावेळी मंत्री जयकुमार गोरे, आयुषमान भारत मिशनचे डॉ. ओमप्रकाश शेटे, एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक, मंत्रालय तथा विधीमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, डिजीटल मीडिया संघाचे राजा माने यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रतिबिंब प्रतिष्ठान संस्थेच्या ध्येयधोरणांची माहिती देण्यात आली आणि संस्थेच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. या विशेष समारंभात राज्यभरातून आलेल्या डिजिटल मीडिया क्षेत्रातील पत्रकार, संपादक, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तींना 'महाराष्ट्र महागौरव पुरस्कार २०२५' प्रदान करण्यात आला.चंद्रकांतदादा पाटील यावेळी म्हणाले,डिजिटल माध्यमांनी माहितीचा प्रसार वेगवान व व्यापक केला आहे. मात्र, पत्रकारांच्या मागे उभं असलेलं कुटुंब त्याग करतं, हे विसरता कामा नये. अशा पार्श्वभूमीवर 'प्रतिबिंब प्रतिष्ठान' सारखी संस्था ही काळाची गरज आहे. पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी नेहमीच कटिबद्ध आहे , अशी भावना यावेळी पाटील यांनी व्यक्त केली. यावेळी पाटील यांनी प्रतिबिंब प्रतिष्ठान मार्फत राज्यातील १२००० पत्रकारांचा विमा काढण्यात येणार असल्याची घोषणा केली. ज्यामध्ये प्रत्येकाला २ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले, आजचा पत्रकार केवळ माहिती पुरवणारा नाही, तर समाजमन घडवणारा प्रभावी घटक आहे. 'प्रतिबिंब प्रतिष्ठान' ही संस्था पत्रकारांच्या सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांच्या कुटुंबाचाही विचार करते, ही अत्यंत स्तुत्य बाब आहे.जयकुमार गोरे यांनी सांगितले,पत्रकार समाज हा समाजाचे आरसे असतो. त्यांचे योगदान मोठे असूनही त्यांच्या कुटुंबाकडे फारसे लक्ष दिले जात नाही. 'प्रतिबिंब प्रतिष्ठान' ही संस्था या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. पत्रकारांच्या मुलांमध्ये आत्मविश्वास, मूल्यसंस्कार आणि स्पर्धात्मक क्षमतांचा विकास घडवण्यासाठी ही संस्था मोलाची भूमिका बजावेल.संस्थेचे अध्यक्ष आणि कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक राजा माने यांनी सांगितले,पत्रकारिता ही केवळ माहिती पुरवण्याचे माध्यम नाही, ती समाजाचे प्रतिबिंब आहे. म्हणूनच संस्थेला 'प्रतिबिंब' हे नाव दिले आहे. पत्रकारांच्या मुलांसाठी एक सशक्त, सकारात्मक व्यासपीठ निर्माण करणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट आहे. पत्रकार कुटुंबांसाठी हे एक विश्वासार्ह आधार केंद्र ठरेल, याची आम्हाला खात्री असल्याचे ते म्हणाले.पत्रकारांच्या मुला-मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी प्रतिबिंब प्रतिष्ठान ही संस्था स्थापन करण्यात आली आहे. पत्रकारांचे जीवन धकाधकीचे आणि तणावपूर्ण असल्याने त्यांच्या कुटुंबाकडे, विशेषतः मुलांकडे, वेळ देणे कठीण होते. या पार्श्वभूमीवर ही संस्था शिक्षण, आरोग्य, मानसिक स्वास्थ्य, मूल्यसंस्कार, कला-क्रीडा आणि करिअर मार्गदर्शन अशा विविध क्षेत्रांमध्ये उपयुक्त उपक्रम राबवणार आहे.

यावेळी डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना, महाराष्ट्र यांच्या संयोजन समितीतील सदस्य,पदाधिकारी सतीश सावंत, महेश कुगांवकर, नंदकुमार सुतार, केतन महामुनी, शामल खैरनार, राजू वाघमारे, विकास भोसले, तेजस राऊत, इक्बाल शेख, दिपक नलावडे, अमोल पाटील, अजिंक्य स्वामी, गणेश हुबे, प्रशांत साळुंके यांची देखील उपस्थिती होती.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .